पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे—४११००७.

संदर्भ:— परीक्षा / वाणिज्य / ३१६४

दि. ०७/०७/२०१०

मा.प्राचार्य,
सर्व संलग्न वाणिज्य महाविद्यालये,

विषय:— व्दितीय / तृतीय वर्ष वाणिज्य मार्च / एप्रिल २०१० परीक्षेच्या निकालाबाबत.......

महोदय / महोदया,

व्दितीय / तृतीय वर्ष वाणिज्य मार्च / एप्रिल २०१० मध्ये घेतलेल्या परीक्षेच्या निकाल दिनांक ०९/०७/२०१० रोजी दुपारी ३:०० वाजता जाहीर करण्यात येत आहे. परीक्षेचा निकाल खालीलप्रमाणे महाविद्यालयात वितरीत करण्यात येईल.

१. पुणे शहरातील व पुणे जिल्हयातील महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांचा निकाल दिनांक ०९/०७/२०१० सकाळी ११:०० ते दुपारी २:०० या वेळेत परीक्षा विभागातून घेऊन जावयाचे आहे.

२. अहमदनगर व नाशिक जिल्हयातील महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांचा निकाल संबंधित विद्यापीठ उपकेंद्रातून दिनांक ०९/०७/२०१० रोजी सकाळी ११:०० ते दुपारी २:०० या वेळेत घेऊन जावयाचे आहे.

आपल्या महाविद्यालयामार्फत उपरोक्त परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची गुणपत्रके निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांना देण्याची व्यवस्था करावी. त्यामुळे विद्यापीठामध्ये निकाल विचारण्यासाठी अथवा इतर चौकशी करण्यासाठी विद्यार्थ्यांना यावे लागणार नाही. त्याचप्रमाणे एखाद्या विद्यार्थ्याच्या गुणपत्रकामध्ये काही दोष अथवा त्रुटी आढळल्यास, विद्यार्थ्याला परस्पर विद्यापीठात न पाठविता महाविद्यालयाच्या प्रतिनिधी मार्फत अशी प्रकरणे तातडीने विद्यापीठाच्या परीक्षा विभागात एकत्रित आणून द्यावीत. यानंतर त्यातील दुरूस्त्या त्वरीत करून घेण्याबाबत कार्यवाही करता येईल.

आपणास विनंती करण्यात येते की, उपरोक्त नमूद केल्यानुसार आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा निकाल वेळेत घेऊन जाण्याची व वितरण करण्याची व्यवस्था करावी.

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
(परीक्षा )

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी:

१. मा. परीक्षानियंत्रक
२. मा. सर्व उपकुलसचिव (परीक्षा.)
३. मा.सर्व सहाय्यक कुलसचिव (परीक्षा)
४. विद्यापीठ उपकेंद्र प्रमुख, नाशिक व अहमदनगर, संबंधित महाविद्यालयांना वेळेवर निकाल देण्याची व्यवस्था करावी.
५. मा.गृहव्यवस्थापक गृहव्यवस्थापन विभाग अहमदनगर, नाशिक जिल्हयासाठी दिनांक ०९/०७/२०१० रोजी सकाळी ठिक ७:०० वाजता दोन स्वतंत्र गाडया उपलब्ध करून देण्यात याव्यात.